# राष्ट्रीय सेवा योजना नियमित उपक्रम अहवाल २०२४-२०२५

## आंतरराष्ट्रीय योग दिन

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त दि. २१ जून २०२४ रोजी शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यासाठी ओनलाईन द्वारे योगाचे प्रात्यक्षिक देण्यात आले. ईशा पिम्पलीकर हिने योगाचे विविध आसन आणि त्याचे लाभ संदर्भात मांडणी केली. यावेळी महाविध्यालायाचे प्राचार्य डॉ. बी. युवकुमार रेड्डी, कार्यक्रम अधिकारी प्रा. गणपत धुमाळे, डॉ. डी. आर. क्षीरसागर, डॉ. रेखा पाहुजा, डॉ. विजेता सिंघ, डॉ. योगेश महाजन, डॉ. अंजली बोंदर, प्रा. ललिता सपकाळे आणि विद्यार्थी सहभागी झाले.





## जळगाव जिल्हा पोलीस विभाग आयोजित कार्यशाळेत सहभागी

जळगाव जिल्हा पोलीस दल आयोजित ०१ जुलै २०२४ रोजी भारताचे नवीन कायदे विषयक कार्यशाळेत प्राचार्य डॉ. बी.युवकुमार रेड्डी, कार्यक्रम अधिकारी प्रा. गणपत धुमाळे, रासेयो स्वयंसेवक सहभागी झाले. या कार्यशाळेत जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. माहेश्वरी रेड्डी यांनी मार्गदर्शन केले.







### जिल्हास्तरीय कार्यक्रम अधिकारी कार्यशाळा

नूतन मराठा महाविद्यालयात दि. १६ जुलै २०२४ रोजी जिल्हास्तरीय कार्यक्रम अधिकारी कार्यशाळा घेण्यात आली. कार्यशाळेचे उद्घाटन कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव च्या रासेयो संचालक डॉ. सचिन नांद्रे आणि नूतन मराठा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल.पी. देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मंचावर जिल्हा समन्वयक डॉ. दिनेश पाटील, डॉ. राजू पाटील हे होते. यावेळी कार्यक्रम अधिकारी म्हणून मनोगत व्यक्त करताना प्रा. गणपत धुमाळे.






### जागतिक आदिवासी दिवस साजरा

महाविद्यालयात ९ ऑगस्ट २०२४ रोजी जागतिक आदिवासी दिवस साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. युवकुमार रेड्डी, डॉ. डी.आर. क्षीरसागर, कार्यक्रम अधिकारी प्रा. गणपत धुमाळे यांनी मार्गदर्शन केले. यानिमित्त आदिवसी समाज घटकांचे समस्या आणि त्यासंदर्भातील कायदे व आदिवासींचे अधिकार संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी रासेयो स्वयंसेवकांनीही मनोगत व्यक्त केले.






### महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण

महाविद्यालय परिसरात राष्ट्रीय सेवा योजना आणि विद्यार्थी विकास विभाग च्या संयुक्त विद्यमाने दि. २० ऑगस्ट २०२४ रोजी वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून के.सी.ई. शिक्षणशास्त्र महाविद्यालय, जळगाव चे प्रा. डॉ. वंदना चौधरी हे होते. महाविध्यालायाचे प्राचार्य डॉ. बी. युवकुमार रेड्डी, कार्यक्रम अधिकारी प्रा. गणपत धुमाळे, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. अंजली बोंदर, डॉ. डी. आर. क्षीरसागर, डॉ. रेखा पाहुजा, डॉ. विजेता सिंघ, डॉ. योगेश महाजन, प्रा. शरद चव्हाण, प्रा. बी.एस. पाटील, प्रा. ललिता सपकाळे, प्रा. स्वाती लोखंडे उपस्थित होते.






महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना एककाच्या मिटिंग प्रसंगी प्रार्थना घेताना स्वयंसेवक आणि कार्यक्रम अधिकारी




## शिरसोली येथे जिल्हा परिषद शाळेच्या आवारात वृक्षारोपण

एस. एस. मणियार विधी महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना एककाच्या वतीने दत्तक गाव शिरसोली येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये दि. २१ सप्टेम्बर २०२४ रोजी वृक्षारोपण करण्यात आले.यावेळी शिरसोली गावचे सरपंच उषा अर्जुन पवार, अर्जुन पवार, बारी समाज माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक आंबटकर, जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक साळुंखे, बारी समाज प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक गोपाळ बारी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. युवाकुमार रेड्डी, डॉ. डी. आर. क्षीरसागर, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. जी. व्ही. धुमाळे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते.











# मणियार विधी महाविद्यालय 'एनएसएस'तर्फे वृक्षारोपण

शिरसोली येथे वृक्षारोपण करताना सरपंच उषा पवार, अर्जुन पवार, प्राचार्य डॉ. रेड्डी.

**प्रतिनिधी** | जळगाव

शहरातील एस.एस. मणियार विधी महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना एककातर्फे दत्तक गाव शिरसोली येथील जिल्हा परिषद शाळेत वृक्षारोपण करण्यात आले. प्राचार्य डॉ. बी. युवाकुमार रेड्डी यांनी वृक्षारोपणाचे महत्त्व व पर्यावरण समतोल संदर्भात मार्गदर्शन केले. सरपंच उषा पवार, अर्जुन पवार, मुख्याध्यापक गोपाळ बारी, डॉ. डी. आर. क्षीरसागर यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते.



दिव्य मराठी जळगाव सिटी 23-09-2024


मणियार विधी महाविद्यालय 'एनएसएस'तर्फे वृक्षारोपण

शिरसोली येथे वृक्षारोपण करताना सरपंच उषा पवार, अर्जुन पवार, प्राचार्य डॉ. रेड्डी.

प्रतिनिधी | जळगाव

शहरातील एस.एस. मणियार विधी महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना एककातर्फे दत्तक गाव शिरसोली येथील जिल्हा परिषद शाळेत वृक्षारोपण करण्यात आले. प्राचार्य डॉ. बी. युवाकुमार रेड्डी यांनी वृक्षारोपणाचे महत्त्व व पर्यावरण समतोल संदर्भात मार्गदर्शन केले. सरपंच उषा पवार, अर्जुन पवार, मुख्याध्यापक गोपाळ बारी, डॉ. डी. आर. क्षीरसागर यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते.


## महात्मा गांधी जयंतीनिमित्त स्वच्छता ही सेवा उपक्रम

महात्मा गांधी जयंतीनिमित्त स्वच्छता ही सेवा उपक्रमा अंतर्गत दि. ०१ ऑक्टोबर २०२४ रोजी महाविद्यालय परिसर स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या उपक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. युवकुमार रेड्डी, कार्यक्रम अधिकारी प्रा. गणपत धुमाळे, डॉ. डी. आर. क्षीरसागर, डॉ. रेखा पाहुजा, डॉ. विजेता सिंघ, डॉ. योगेश महाजन, डॉ. अंजली बोंदर, प्रा. शरद चव्हाण, प्रा. बी.एस. पाटील, प्रा. स्वाती लोखंडे आणि स्वयंसेवकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला. यावेळी प्राचार्य डॉ. बी. युवकुमार रेड्डी यांनी स्वभाव स्वच्छता संस्कार स्वच्छता संदर्भात मार्गदर्शन केले.












## दीपावलीनिमित्त गरजू लोकांसाठी कपडे वाटप

दीपावली दरम्यान येणाऱ्या थंडीच्या काळात थंडीपासून संरक्षण आणि दीपावलीनिमित्त गरजू लोकांसाठी कपडे वाटपाचा कार्यक्रम दि. २६ ऑक्टो. २०२४ रोजी घेण्यात आला. रासेयो स्वयंसेवकांनी आपल्याकडील कपडे स्वच्छ धुवून प्रेस करून संकलित केली. प्राचार्य डॉ. बी. युवकुमार रेड्डी यांच्या उपस्थितीत कपडे संकलित करण्यात आली त्यानंतर स्वयंसेवकांनी संकलित कपडे रेल्वे स्थानक, नेरी नाका, बस स्थानक आणि निवारा या बेघर लोकांच्या निवासस्थानी गरजू लोकांना वाटप केली.





















एस. एस. मणियार विधी महाविद्यालयात खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटी, जळगाव च्या वर्धापन दिन सप्ताह अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना संदर्भात कार्यशाळा घेण्यात आली. यावेळी कबचौउमवि राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. सचिन नांद्रे, मु.जे. महाविद्यालयाचे रासेयो महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. जयश्री भिरूड हे प्रमुख पाहुणे लाभले होते. यावेळी त्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचा ऐतिहासिक आढावा घेऊन विविध उपक्रमाची माहिती दिली.







सेवा से सीखे उपक्रमा अंतर्गत दि २७ ते ३० ऑक्टोबर दरम्यान रुग्णालयात जाऊन अनुभवात्मक शिक्षण, वाहतूक पोलिसांच्या सहकार्याने वाहतूक व्यवस्थापन करताना रासेयो स्वयंसेवक ईश्वर मांडोळे.













दीपावलीनिमित्त दीपावलीचा गोडधोड खाऊ महाविद्यालयाच्या रासेयो स्वयंसेवकांनी संकलित करून ०५ नोव्हेंबर २०२४ रोजी बेघर लोकांच्या निवारा वसतीगृह येथे व भंगार वेचणाऱ्या लोकांना वाटप केले. तत्पूर्वी महाविद्यालयात परिसरात सार्वत्रिक निवडणुकीतील मतदान टक्केवारी वाढावी म्हणून जनजागृती करण्यात आली. यावेळी जिल्हा आयकॉन मदन लाठी, कार्यक्रम अधिकारी प्रा. गणपत धुमाळे, प्रा. बी.एस. पाटील उपस्थित होते.














# एस.एस. मणियार विधी कॉलेजात मतदान जनजागृती

लोकमत न्यूज नेटवर्क

जळगाव : येथील एस.एस. मणियार विधी महाविद्यालयात दि.५ नोव्हेंबर रोजी राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने मतदानाचा टक्का वाढवा यासाठी सर्वांनी मतदान जेणेकरून लोकशाही बळकट होईल, असे आवाहन केले. यावेळी प्रा.जी.व्ही. धुमाळे, प्रा. बी.एस. पाटील, कमलेश सोनवणे, जिल्हा आयकॉन मदन लाठी आदी उपस्थित होते.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथे दि. ०७ ते १६ नोव्हेंबर २०२५ दरम्यान महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ आपत्ती पूर्वतयारी प्रशिक्षण शिबीर (आव्हान) साठी महाविद्यालयाचा स्वयंसेवक ईश्वर मांडोळे सहभागी होऊन विशेष कामगिरी बजावली.




सार्वत्रिक निवडणुकीत 20 नोव्हेंबर २०२४ रोजी महाविद्यालयाच्या स्वयंसेवकांनी मतदानाच्या बुथवर वयोवृद्ध लोकांना मदार करताना.







जागतिक एड्स दिनानिमित्त दि. १ डिसेम्बर २०२४ रोजी राष्ट्रीय सेवा योजना एकक आणि महाराष्ट्र शासन जिल्हा एड्स प्रतिबंधक व नियंत्रण विभाग, जिल्हा सामान्य रुग्णालय, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने "मार्ग हक्काचा, सन्मानाचा!" घोषवाक्य घेऊन युवा वर्गामध्ये जनजागृती करण्यासाठी प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले. यावेळी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. सचिन नांद्रे, विनोद ढगे आणि संघ विविध महाविद्यालयाचे कार्यक्रम अधिकारी उपस्थित होते. यावेळी डॉ. सचिन नांद्रे, प्रा. जी. व्ही. धुमाळे यांनी मार्गदर्शन केले. तर विनोद ढगे यांनी पथनाट्याच्या माध्यमातून प्रबोधन केले.






एस.एस. मणियार विधी महाविद्यालय, जळगाव यांच्या वतीने आणि रेडकॉस सोसायटी यांच्या सहयोगाने दि. 30 डिसेंबर 2024रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.यावेळी रक्तदान हेच जीवनदान देण्याची सर्वात मोठी कृती आहे असे यावेळी प्राचार्य डॉ. बी. युवकुमार रेड्डी यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेत रक्तदान केले.









**महाविद्यालयात एड्स प्रतिबंध जनजागृती**

एस. एस. मणियार विधी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना, जिल्हा प्रतिबंधक व नियंत्रण पथक, चेतनदास मेहता रुग्णालय, जळगाव आणि रेड रिबन क्लब अंतर्गत जागतिक एड्स दिनाच्या औचित्याने दि. १५ जानेवारी २०२५ रोजी एड्स प्रतिबंधात्मक जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.

या कार्यक्रमास प्रमुख वक्ते म्हणून डॉ. प्रशांत मोरे हे लाभले होते. यावेळी मंचावर प्राचार्य डॉ. बी. युवाकुमार रेड्डी, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. जी. व्ही. धुमाळे, डॉ. डी.आर. क्षीरसागर हे होते. कार्यक्रमास डॉ. रेखा पाहुजा, डॉ. योगेश महाजन, डॉ. अंजली बोंदर, डॉ. विजेता सिंग, प्रा. शरद चौव्हाण, प्रा. अमिता वराडे. प्रा. बी.एस. पाटील, प्रा. नितीन मटकरी, डॉ. ज्योती भोळे, प्रा. स्वाती लोखंडे हे उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. मोरे यांनी एड्स ची लक्षणे काय, एड्स होण्याची कारणे आणि त्यासंदर्भात समज-गैरसमज स्पष्ट करून कोणत्या प्रकारची खबरदारी घेतली पाहिजे या संदर्भात मार्गदर्शन केले व प्रश्न उत्तराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या शंकाचे निरसन करण्यात आले.






शिवजयंती निमित्त युवा कल्याण व क्रीडा मंत्रालय, भारत सरकारच्या संयुक्त विद्यमाने जय शिवाजी जय भारत पदयात्रेचे आयोजन करण्यात आले. या पदयात्रेत महाविद्यालयाचे स्वयंसेवक सहभागी झाले होते.


























आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त दि. ११ मार्च २०२५ रोजी महाविद्यालयात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख वक्ते म्हणून मानसी गगधानी या लाभल्या होत्या. यावेळी मंचावर प्राचार्य

डॉ. बी. युवकुमार रेड्डी, अॅड. ज्योती भोळे कार्यक्रम अधिकारी प्रा. गणपत धुमाळे आणि डॉ. अंजली बोंदर हे होते. कार्यक्रमास डॉ. रेखा पाहुजा, डॉ. योगेश महाजन, डॉ. विजेता सिंग, प्रा. शरद चौव्हाण, प्रा. अमिता वराडे. प्रा. बी.एस. पाटील, प्रा. नितीन मटकरी, प्रा. स्वाती लोखंडे हे उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना मानसी गगधानी यांनी महिलांवर लादलेली पुरुषसत्ताक मूल्य आणि त्याविरोधातील महिलांचे अधिकार यासंदर्भात मार्गदर्शन केले. अॅड. ज्योती भोळे यांनीही मनोगत व्यक्त केले. डॉ. रेड्डी यांनी अध्यक्षीय मार्गदर्शन केले. तत्पूर्वी प्रा. धुमाळे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. डॉ. अंजली बोंदर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करून शेवटी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.







महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून १४ एप्रिल २०२५ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. युवकुमार रेड्डी, प्रा. गणपत धुमाळे, डॉ. विजेता सिंग, प्रा. बी.एस. पाटील, प्रा. नितीन मटकरी व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून वंदना घेण्यात आली.







गणपत व्यं. धुमाळे
कार्यक्रम अधिकारी रासेयो

डॉ. बी. युवकुमार रेड्डी
प्राचार्य